# राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१३

## अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ

## घोषणा

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१३ करिता अधिसूचना आयोगाच्या संकेतस्थळावर दि.७ सप्टेंबर, २०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१३ च्या जाहिरातीतील टिप मध्ये नमूद केल्यानुसार (इतर संवर्गाकरीता शासनाकडून पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ती उपलब्ध झाल्यास त्यांचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत करण्यात येईल.) आणि शासनाच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१३ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी, गट-अ ४० पदे ( अराखीव - १६, अ.जा. - ४, अ.ज. - ६, वि.जा.(अ) - ४, भ.ज. (ब) - २ , वि.मा.प्र. - १ ,भ.ज.(क) - ३, भ.ज. (ड) - १, इ.मा.व. - ३ ) व तहसिलदार गट-अ ३४ पदे ( अराखीव - १०, अ.जा. - ४, अ.ज. - ३, वि.जा.(अ) - ३, भ.ज. (ब) - १ , भ.ज.(क) - १, भ.ज. (ड) - १, इ.मा.व. - ११ ) या संवर्गातील एकूण ७४ पदांचा समावेश सदर अधिसूचनेत करण्यात येत आहे. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २०१३ करिता दि.७ जानेवारी, २०१३ रोजी विज्ञापित करण्यात आलेल्या जाहिरातीतील ४.२.१ मध्ये नमूद केल्यानुसार तहसिलदार गट-अ पदाकरिता वयोगणना दि. १ मे, २०१३ रोजी करण्यात येईल. तसेच उपजिल्हाधिकारी, गट-अ पदाकरिता वयोगणना दि. १ एप्रिल, २०१४ रोजी करण्यात येईल.

उमेदवारांना (मुख्य) परीक्षेचे अर्ज भरण्याकरिता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

(१) विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी **चलनाची प्रत घेण्याची** अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिग, अथवा संग्राम केंद्र/ सीएससी - नागरिक सेवा केंद्राद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक ३० सप्टेंबर,२०१३ रोजी २३.५९ वाजेपर्यत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

(२)चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये **दिनांक १ ऑक्टोबर,२०१३ पर्यत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत** भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

मुंबई
दिनांक :- २६ सप्टेंबर, २०१३

**उप सचिव**,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग